ADFACTORS PR
Knowledge-driven communications

| | | | |
|---|---|---|---|
| Published Date: | 3 Oct 2018 | Publication: | Aapla Vartahar (Marathi) |
| Edition: | Mumbai | Page No: | 4 |
| MAV/CCM: | 16416/13.68 | Circulation: | 22800 |

# टीसीएस आयटी विझ ७ ऑक्टोबर रोजी

मुंबई, दि. २ - टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस) या अग्रगण्य आयटी सेवा, सल्लागार आणि व्यवसाय सोल्यूशन्स फर्मने टीसीएस आयटी विझ २०१८ या भारतातील शालेय मुलांसाठीच्या सर्वात मोठ्या तंत्रज्ञान प्रश्नमंजूषेच्या मुंबई आवृत्तीची आज घोषणा केली. ही स्पर्धा ७ ऑक्टोबर रोजी इंडियन एज्युकेशन सोसायटी, माणिक सभागृह, लिलावती हॉस्पिटलसमोर, वांद्रे रिक्लमेशन येथे घेतली जाणार आहे. ८ वी ते १२ वी तील विद्यार्थी या स्पर्धेत भाग घेण्यास पात्र आहेत. यासाठी कोणतेही प्रवेशशुल्क नाही. ही स्पर्धा अहमदाबाद, बेंगळुरू, भुवनेश्वर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, इंदोर, कोची, कोलकाता, मुंबई, नागपूर आणि पुणे याठिकाणी होणार आहे. यासाठी संबंधित शिक्षणसंस्थांमार्फत प्रवेशिका ५ ऑक्टोबर पूर्वी टीसीएस आयटी विझ को-ऑर्डिनेटर, टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस, टीसीएस हाउस, रव्हलीन स्ट्रीट, २१ डीएस मार्ग, फोर्ट या पत्त्यावर पाठवणे आवश्यक आहे.